॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

अहिल्यानगर ■ शनिवार, दि. ६ जून २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १२ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ■ 9420802145 ■ www.veerbhuminews.com

**✲ सुविचार ✲**

स्वाभिमान गमावून मोठे होण्यापेक्षा,
लहान राहून अभिमान ठेवणे जास्त चांगले.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### परिषद

ही ओढ असते जणू
प्रत्येकच साच्यामध्ये
सत्तेची गुणसूत्रे येतात
मामाकडून भाच्यामध्ये

पदाकडेच लागूनच
असते जेव्हा लक्ष
कपड्यासारखा सहज
बदलता येतो पक्ष

# कॅनमध्ये डिझेल दिल्यास पेट्रोल पंपाचा परवाना थेट रद्द

## राज्य सरकारच्या नव्या परिपत्रकामुळे खळबळ । मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे हस्तक्षेपाची मागणी

**● मुंबई । वीरभूमी–**

सध्या पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या दरांमुळे सर्वसामान्य नागरिक आधीच त्रस्त असताना, आता इंधन पुरवठ्याबाबत राज्य सरकारने एक अत्यंत कडक पाऊल उचलले आहे. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने डिझेल खरेदी आणि पुरवठ्यासंदर्भात एक नवीन परिपत्रक जारी केले आहे. या नव्या नियमानुसार, जर कोणत्याही पेट्रोल पंपावर ग्राहकाला कॅन किंवा ड्रममध्ये डिझेल देण्यात आले, तर संबंधित पेट्रोल पंपाचा परवाना थेट रद्द करण्यात येणार आहे. सरकारच्या या कठोर भूमिकेमुळे राज्यातील पेट्रोल पंप चालकांचे धाबे दणाणले आहेत.

गेल्या काही दिवसांत इंधनाचा तुटवडा होणार असल्याच्या अफवांमुळे अनेक ठिकाणी नागरिकांनी ड्रम आणि कॅन भरभरून ज्यादा पेट्रोल आणि डिझेल नेल्याचे प्रकार समोर आले होते. यामुळे कृत्रिम टंचाई निर्माण झाली होती. सरकारने इंधनाचा अवाजवी साठा न करण्याचे निर्देश देऊनही साठेबाजी सुरूच राहिल्याने शेवटी हा कडक निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, सरकारच्या या नव्या परिपत्रकामुळे काळाबाजार करणाऱ्यांना चाप बसेल, तरी लाखो कायदेशीर आणि प्रामाणिक ग्राहकांवर याचा प्रचंड वाईट परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



‘चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्री अँड ट्रेड’ म्हणजेच कॅमिट या व्यापारी संघटनेने या परिपत्रकाबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

कॅमिटच्या मते, हा नियम सध्याच्या स्वरूपात लागू झाल्यास अनेक अत्यावश्यक सेवा आणि उद्योग अडचणीत येतील. कारण अनेक ठिकाणी यंत्रसामग्री किंवा जनरेटर चालवण्यासाठी कॅनमधूनच डिझेल नेले जाते. या निर्णयाचा थेट फटका रुग्णालये, नर्सिंग होम्स, डायग्नोस्टिक केंद्रे, गृहनिर्माण संस्था, निवासी संकुले, हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, बँक्वेट हॉल्स, शैक्षणिक संस्था, किरकोळ दुकाने, व्यापारी आस्थापने, लघु व मध्यम उद्योग, गोदामे, कोल्ड स्टोरेज, टेलिकॉम टॉवर्स, बँका, एटीएम सेवा, इव्हेंट मॅनेजमेंट कंपन्या, बांधकाम क्षेत्र तसेच कृषी क्षेत्राला बसू शकतो. याशिवाय डिझेल जनरेटर आणि डिझेलवर चालणाऱ्या विविध उपकरणांवर अवलंबून असलेल्या असंख्य व्यावसायिक घटकांचे कामकाज यामुळे ठप्प होऊ शकते.

व्यापारी संघटनेने म्हटले आहे की, ते काळाबाजार आणि अनधिकृत डिझेल व्यापाराविरोधातील कठोर कारवाईचे पूर्ण समर्थन करतात, परंतु अशा उपाययोजनांमुळे प्रामाणिक ग्राहकांना विनाकारण त्रास होऊ नये. परिपत्रकाच्या अंमलबजावणीबाबत संभ्रम निर्माण झाल्यास, कारवाईच्या भीतीने पेट्रोल पंप चालक वैध आणि गरजू ग्राहकांनाही डिझेल देण्यास कचरतील. परिणामी, अत्यावश्यक सेवा, उद्योग, व्यापार आणि सर्वसामान्यांच्या दैनंदिन कामकाजात मोठे अडथळे निर्माण होऊ शकतात. याच पार्श्वभूमीवर कॅमिटने थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. संबंधित परिपत्रकाबाबत आवश्यक ती स्पष्टता आणून प्रामाणिक व्यावसायिक घटकांना दिलासा द्यावा, अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. आता यावर राज्य सरकार काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## SPOT NEWS

### बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात अवैध वाहतुकीवर बंदी

**● मुंबई –** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) सर्व बसस्थानक परिसरात होणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीला पूर्णपणे आळा घालण्यासाठी राज्य सरकारने कंबर कसली आहे. बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात खाजगी वाहने उभी करून प्रवासी भरणाऱ्या किंवा उतरवणाऱ्या वाहनांवर आता थेट कायदेशीर बडगा उगारला जाणार आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी या संदर्भात राज्यभर विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्याचे कडक निर्देश दिले असून, महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता विभागाने या संदर्भातील अधिकृत परिपत्रकही जारी केले आहे. राज्यभरात ही विशेष तपासणी आणि अंमलबजावणी मोहीम ५ जून ते १५ जून २०२६ या १० दिवसांच्या कालावधीत सर्व विभागांमध्ये संयुक्तपणे राबविण्यात येणार आहे. या काळात बसस्थानक परिसरात अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर करडी नजर ठेवली जाईल. एसटी महामंडळ ही राज्यातील सर्वसामान्यांची जीवनवाहिनी असल्याचे सांगत प्रताप सरनाईक यांनी अवैध वाहतूक करणाऱ्यांना कडक इशारा दिला आहे. एसटीच्या उत्पन्नावर थेट परिणाम करणारी आणि प्रवाशांच्या सुरक्षेला मोठा धोका निर्माण करणारी अवैध प्रवासी वाहतूक कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली आहे.

### महाडीबीटी पोर्टलवर खरीप बियाणांचे वितरण

**● मुंबई –** राज्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने यंदा महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून खरीप हंगामासाठी आवश्यक असलेली प्रमाणित बियाणे आता महाडीबीटी पोर्टलवर ‘प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य’ या तत्त्वावर बियाणांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. राज्यात यंदा खरीप हंगाम प्रमाणित बियाणे व प्रात्यक्षिक कार्यक्रम राबविण्यात येणार असून त्याअंतर्गत शेतक–यांना विविध पिकांची गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. यामध्ये सोयाबीन, मूग, उडीद, भुईमूग, बाजरी आणि कापूस या प्रमुख पिकांचा समावेश आहे.

## आरबीआयने रेपो रेट ५.२५ टक्क्यांवर स्थिर ठेवला

**● मुंबई । वीरभूमी–**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने आज चालू आर्थिक वर्षातील दुसरे द्वैमासिक पतधोरण जाहीर केले. आरबीआयचे गव्हर्नसर संजय मल्होत्रा यांच्या नेतृत्वाखालील पतधोरण समितीने रेपो रेटमध्ये कोणताही बदल न करण्याचा निर्णय घेतला आहे. रेपो रेट ५.२५ टक्क्यांवर कायम ठेवण्यात आला आहे. त्यामुळे इंधन दरवाढीने पिचलेल्या सर्वसामान्य जनतेला ईएमआय कमी होण्यासाठी आखणी वाट पहावी लागणार आहे.





आरबीआयची पतधोरण समितीची तीन दिवसीय बैठक ३ जून ते ५ जून या कालावधीत झाली. या बैठकीमध्ये रेपो रेटमध्ये कोणताही बदल न करण्यावर एकमत झाले. पतधोरण समितीच्या सर्व सदस्यांनी रेपो रेट ५.२५ टक्क्यांवर स्थिर ठेवण्याच्या बाजूने एकमताने मतदान केले आहे. महागाईवर नियंत्रण ठेवणे आणि आर्थिक विकासाला गती देणे यामध्ये समतोल साधण्यासाठी आरबीआयने तटस्थ भूमिका कायम ठेवली आहे, असे आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितले.

परकीय चलनसाठा ६८२.३ अब्ज डॉलर्सवर पोहोचला असल्याची माहिती आरबीआय गव्हर्नर यांनी दिली. यासोबतच, आरबीआयने ‘स्पेसिफाइड सिक्युरिटीज’ची व्याप्ती वाढवत त्यात १५, ३० आणि ४० वर्षांच्या सर्व नवीन सरकारी रोख्यांचासमावेश केला आहे. तसेच, शेअर बाजारात गुंतवणूक करणाऱ्या अनिवासी भारतीयांना आणि ओव्हरसीज सिटीझन्स ऑफ इंडिया यांना मोठा दिलासा देत सेबी नोंदणीशिवाय इक्विटी इन्स्ट्रुमेंट्समध्ये गुंतवणूक करण्याची मर्यादा वाढवण्याचा प्रस्ताव आरबीआयने मांडला आहे. आरबीआयने व्याजदरात कोणताही बदल न केल्यामुळे गृहकर्ज, कार लोन किंवा वैयक्तिक कर्जाच्या मासिक हप्त्यांमध्ये सध्या तरी कोणताही बदल होणार नाही. वाढत्या महागाईला वेसण घालण्यासाठी बँकेने हे पाऊल उचलले आहे. जर आगामी काळात कच्च्या तेलाच्या किमती आणि मान्सूनची स्थिती सुधारली तरच व्याजदरात कपातीची अपेक्षा करता येईल, असे तज्ज्ञांचे मत आहे.

आरबीआयने आर्थिक वर्ष २०२६–२७ साठी देशाच्या वास्तविक जीडीपी वृद्धीदराचा अंदाज आधीच्या ६.९ टक्क्यांवरून कमी करून ६.६ टक्के केला आहे. पहिल्या तिमाहीत विकासदर ६.६ टक्के, दुसऱ्या तिमाहीत ६.३ टक्के, तिस–या तिमाहीत ६.५ टक्के आणि चौथ्या तिमाहीत ६.८ टक्के राहण्याचा अंदाज आहे.

## मान्सून उंबरठ्यावर; ३ दिवसांत पुढे सरकणार

**● मुंबई । वीरभूमी–**

तीव्र उष्णतेपासून दिलासा देणारा मान्सून गुरुवारी केरळमध्ये दाखल झाला असून मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी हवामानाची स्थिती अनुकूल आहे, अशी माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली. मान्सूनचा उत्तर दिशेकडील प्रवास सुरू झाला आहे.

तीव्र उष्णतेपासून दिलासा देणारा मान्सून गुरुवारी केरळमध्ये दाखल झाला असून मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी हवामानाची स्थिती अनुकूल आहे, अशी माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली. मान्सूनचा उत्तर दिशेकडील प्रवास सुरू झाला आहे. दरम्यान, सॅटेलाईट प्रतिमांमध्ये केरळ, कर्नाटक आणि गोवा किनारपट्टीवर शुक्रवारी दाट ढगांची दाटी दिसून येत असून ढगांचा हा पट्टा तळकोकणाच्या जवळपास पोहोचल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे लवकरच राज्यात मोसमी वाऱ्यांचे आगमन होईल, अशी शक्यता हवामान अभ्यासकांकडून व्यक्त केली जात आहे.

अंदमान येथे १६ मे रोजी दाखल झालेल्या मान्सूनची वाटचाल काहीशी संथ गतीने सुरू होती. त्यामुळे मान्सून केरळ किनारपट्टीवर कधी दाखल होतो, याकडे देशासह महाराष्ट्रातील नागरिकांचे लक्ष लागले होते. अखेर गुरुवारी केरळच्या किनापट्टीवर मान्सूनचे आगमन झाल्याची घोषणा हवामान विभागाकडून करण्यात आली. मोसमी वा–यांनी आग्नेय बंगालचा उपसागर, कर्नाटकचा काही भाग, तामिळनाडू, कोमोरिन परिसराचा उर्वरित भाग, केरळ, नैऋत्य व आग्नेय अरबी समुद्राच्या उर्वरित भागात वाटचाल केली आहे, अशी माहिती हवामान विभागाने शुक्रवारी दिली.

सॅटेलाईट प्रतिमांमध्ये केरळ किनारपट्टी, कर्नाटक आणि गोव्याच्या संपूर्ण किनापट्टीवर शुक्रवारी दाट ढगांची दाटी दिसून येत आहे. त्यामुळे या प्रदेशात मान्सूनचे आगमन केव्हा होते यावर आता हवामान अभ्यासकांसह हवामान विभागाचेही लक्ष आहे. ढगांचा हा पट्टा हळूहळू तळकोकणाच्या दिशेने सरकत आहे. पुढील ४८ तासांत हीच स्थिती कायम राहिली, तर तळकोकणात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. मान्सूनच्या पुढील प्रगतीसाठी हवामानाची ही स्थिती अनुकूल मानली जाते.

पुढील २ ते ३ दिवसांत नैऋत्य मोसमी वारे आणखी पुढे सरकण्यासाठी अनुकूल परिस्थिती असून राज्यातील दक्षिण किनारपट्टीवर पुढील काही दिवसांत मोसमी वारे दाखल होतील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. त्यानुसार, रविवार, ७ जून किंवा सोमवार, ८ जून रोजी राज्याच्या दक्षिण किनारपट्टीवर मान्सून दाखल होण्याचा अंदाज आहे. मात्र, स्थिती अनुकूल राहिल्यास या अंदाजाच्या आधीही मान्सून गोव्यासह तळकोकणात दाखल होण्याची शक्यता आहे. दरम्यान, आज राज्यातील अनेक भागात पावसाचा ‘यलो अलर्ट’ तर काही भागात ‘ऑरेंज अलर्ट’ देण्यात आला आहे.

## शासकीय जमीन हस्तांतरणाचे कलेक्टरना अधिकार; प्रस्तावाच्या मंजुरीसाठी मंत्रालयाचे खेटे बंद

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

**● मुंबई । वीरभूमी–**

शासकीय जमिनींसंदर्भातील प्रस्तावांच्या मंजुरीसाठी मंत्रालयाच्या फे–या माराव्या लागणा–या नागरिकांना आणि विकासकांना मोठा दिलासा मिळणार आहे. कारण आता सरकारने महत्त्वाचा निर्णय घेत शासकीय जमिनींची विक्री, हस्तांतरण, पुनर्विकास तसेच वापरातील बदल यासंबंधीचे अनेक अधिकार जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांकडे सोपविले आहेत. त्यामुळे स्थानिक स्तरावरच प्रस्तावांवर निर्णय होऊन प्रक्रिया अधिक वेगवान होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

महसूल विभागाने या निर्णयासंदर्भातील परिपत्रक जारी केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेअंतर्गत करण्यात आलेल्या या बदलामुळे अनेक प्रस्तावांसाठी मंत्रालयाची मंजुरी घेण्याची आवश्यकता कमी होणार आहे. त्यामुळे पर्यायाने मंत्रालयावरील ताण कमी होणार आहे.



आतापर्यंत शासकीय जमिनींची विक्री, हस्तांतरण, पुनर्विकास, अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक किंवा विकास हक्क हस्तांतरणाशी संबंधित प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी मंत्रालयाकडे पाठवावे लागत होते. त्यामुळे प्रक्रिया दीर्घकाळ रखडत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत होत्या. त्या पार्श्वभूमीवर हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, यापूर्वी जारी करण्यात आलेल्या २८ डिसेंबर २०१५ आणि १७ सप्टेंबर २०१६ च्या अधिसूचना रद्द करण्यात आल्या आहेत. नजराणा आणि अन्य शुल्कांची वसुली मात्र नियमानुसारच केली जाणार आहे.

नव्या निर्णयानुसार १० लाख रुपयांपर्यंतच्या प्रकरणांमध्ये निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिका–यांना देण्यात आला आहे तर वीस लाख रुपयांपर्यंतच्या प्रस्तावांवर विभागीय आयुक्त स्तरावर मंजुरी दिली जाऊ शकते.

महसूल विभागाच्या निर्णयामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि प्रवासाचा खर्च वाचणार असल्याचा दावा शासनाकडून करण्यात आला. स्थानिक पातळीवरच प्रस्ताव निकाली निघणार असल्याने विकासकामांना गती मिळू शकणार आहे.

# प्रोटीनच्या नावाखाली तरुणांना गुंगीकारक इंजेक्शन विक्री करण्याच्या रॅकेटचा पर्दाफाश

## पाथर्डी पोलिसांची अवैध औषध विक्री विरोधात कारवाई । एकाला अटक, एकजण पसार

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी पोलिसांनी अवैध औषध विक्रीविरोधात धडाकेबाज कारवाई करत जिममधील तरुणांना प्रोटीन व स्नायूवर्धक औषधांच्या नावाखाली गुंगीकारक इंजेक्शन विक्री करण्याच्या संशयित रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत ६२ हजार ५०४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले आहे, तर दुसरा आरोपी फरार आहे. दि. ४ जून २०२६ रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पाथर्डी पोलिसांनी अन्न व औषध प्रशासन विभागासह संयुक्त कारवाई केली. या पथकात पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विशाल लहाने, सहायक फौजदार विलास जाधव, कॉन्स्टेबल इजाज सय्यद, संजय जाधव, ज्ञानेश्वर इलग, सागर बुधवंत, सचिन हाडके, प्रवीण भोजे, आप्पासाहेब तांबे तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाचे औषध निरीक्षक शेख जावेद हुसेन सहभागी होते.

तालुक्यातील करंजी येथील चौफुली परिसरात संशयास्पद हालचाली करणाऱ्या एका युवकाची तपासणी करण्यात आली. त्या वेळी त्याच्याकडे असलेल्या पिशवीतून मेफेन्टरमाईन सल्फेट इंजेक्शनच्या आठ सीलबंद बाटल्या आढळून आल्या. सुरुवातीला संबंधित युवकाने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र पोलिसांनी विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव शेरू राजू शेख (वय २५, रा. इंदिरानगर, पाथर्डी) असे सांगितले. चौकशीदरम्यान शेरू शेख याने ही औषधे अहिल्यानगर येथील मुकुंदनगर परिसरातील मोहसिन शेख याच्याकडून खरेदी केल्याची माहिती दिली.

ही औषधे व्यायामशाळेत जाणाऱ्या तरुणांना तसेच इतर ग्राहकांना स्नायूवर्धक औषध अथवा प्रोटीन असल्याचे भासवून विक्री करण्याचा त्याचा उद्देश असल्याचे तपासात समोर आले आहे.

वैद्यकीय सल्ल्याशिवाय व वैध डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय ही औषधे विक्रीसाठी आणण्यात आल्याचेही उघड झाले. या संदर्भात अन्न व औषध प्रशासन विभागाचे औषध निरीक्षक शेख जावेद हुसेन यांना पाथर्डी पोलिसांनी माहिती दिली. त्यांनी पोलिस ठाण्यात येऊन औषधांची तपासणी केली असता संबंधित इंजेक्शन हे ‘एच’ प्रवर्गातील औषध असल्याचे स्पष्ट झाले.

अशा प्रकारची औषधे डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय विक्री करता येत नाहीत. तसेच त्यांचा अयोग्य वापर मानवी आरोग्यास गंभीर धोका निर्माण करू शकतो, असेही त्यांनी नमूद केले. या कारवाईत २ हजार ५०४ रुपये किमतीच्या इंजेक्शनच्या आठ बाटल्या, दोन मोबाईल असा एकूण ६२ हजार ५०४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तपासणीसाठी चार कुप्यांचे नमुने सीलबंद करून ताब्यात घेण्यात आले असून उर्वरित कुप्या पोलिसांच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत.

या प्रकरणी शेरू राजू शेख याच्यासह मोहसिन शेख (रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला



आहे. मोहसिन शेख सध्या फरार असून त्याचा शोध सुरू आहे. पुढील तपास पाथर्डी पोलीस करीत आहेत.

# SPOT NEWS

## वृक्षारोपण आणि प्लास्टिक मुक्ती संदेशाने हरदिन मॉर्निंग ग्रुपचा पर्यावरण दिन साजरा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी वर्षभर विविध उपक्रम राबविणाऱ्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ऐतिहासिक चाँदबीबी महाल परिसरात वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आणि प्लास्टिकमुक्ती जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने घेण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. त्यानंतर डोफ्लगर परिसर व चाँदबीबी महाल परिसरात स्वच्छता अभियान राबवून प्लास्टिक व इतर कचरा संकलित करण्यात आला. पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या प्लास्टिकच्या वापराविरोधात जनजागृती करण्यात आली. विशेष म्हणजे लावण्यात आलेल्या प्रत्येक वृक्षाच्या संगोपन व संवर्धनाची जबाबदारी ग्रुपच्या सदस्यांनी स्वीकारली. यावेळी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, राजू कांबळे, पवन वाघमारे, रमेश वराडे, जहीर सय्यद, सचिन चोपडा, सर्वेश सपकाळ, मेजर दिलीप ठोकळ, अशोक पराते, ताराचंद ठोकळ, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, अविनाश पोतदार, अभिजीत सपकाळ, यशराज माने, मनोज मेहेर, सायकलपटू त्रिंबकराव नेटके, सचिन पेंढूरकर, दिलीप गुगळे, नवनाथ वेताळ, जालिंदर अळकुटे, रामनाथ गर्जे, दीपक धाडगे, मनोहर दरवडे, मुन्ना वाघस्कर, किरण फुलारी, प्रकाश देवळालीकर, दीपक घोडके, ड. उद्धव चिमटे, आराध्या परदेशी, सोहम चेमटे, सूर्यकांत कटोरे, यश भिंगारदिवे, रतनशेठ मेहेत्रे, सुधीर कपाळे, सखाराम अळकुटे, अविनाश जाधव, उत्तम वाघस्कर, दशरथराव मुंडे, प्रशांत भिंगारदिवे, राजू शेख, भारत कनोजिया, अजय झिंजे, आनंद दळवी, राकेश वाडेकर, सतीश काळे यांच्यासह अनेक पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते. प्रा. माणिक विधाते म्हणाले की, पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज बनली आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा वाढता वापर यामुळे पर्यावरणासमोर गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत. अशा परिस्थितीत प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. वृक्ष हे केवळ पर्यावरणाचे रक्षक नसून भावी पिढ्यांसाठी अमूल्य ठेवा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## अहिल्यानगर लीग २०२५-२६ फुटबॉल स्पर्धेत फिरोदिया शिवाजियन्स विजयी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन (एडीएफए) आयोजित अहिल्यानगर लीग २०२५-२६ स्पर्धेचा शानदार समारोप चुरशीच्या अंतिम सामन्याने झाला. भुईकोट किल्ला मैदान येथे अंतिम सुपर लीग सामना फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब विरुध्द सुमन फुटबॉल क्लब यांच्यात झाला. अत्यंत रंगतदार झालेल्या या सामन्यात फिरोदिया शिवाजियन्स संघाने सुमन फुटबॉल क्लबवर वर ३-२ गोलने विजय मिळवत विजेतेपद पटकावले. फिरोदिया शिवाजियन्स संघाने संपूर्ण स्पर्धेत शानदार कामगिरी करत सलग ८ सामने जिंकले तसेच लीग आणि सुपर लीगमध्ये पूर्ण गुण मिळवत अजिंक्यपद संपादन केले. फिरोदिया शिवाजियन्स कडून अभय साळवे याने १० व्या मिनिटाला पहिले गोल केले. त्यानंतर हिमांशू चव्हाण याने २६ व्या मिनिटाला पेनल्टीवर गोल करत आघाडी वाढवली. सुमन फुटबॉल क्लब कडून अविनाश शिंदे याने २९ व्या मिनिटाला पेनल्टीवर गोल करत फरक कमी केला. दुसऱ्या हाफमध्ये अभय साळवे याने ४५ व्या मिनिटाला पुन्हा गोल करत संघाची आघाडी मजबूत केली. अखेरीस अविनाश शिंदे याने ७० व्या मिनिटाला गोल करत सामना रंगतदार केला. या लीग स्पर्धेत १२ संघांचा सहभाग होता. सुपर लीगमध्ये फिरोदिया शिवाजियन्स, सुमन फुटबॉल क्लब, बाटा फुटबॉल क्लब आणि गुलमोहर फुटबॉल क्लब या चार संघांनी प्रवेश केला. सुपर लीगमध्ये एकूण ६ सामने खेळविण्यात आले. अंतिम सुपर लीग क्रमवारीत प्रथम- फिरोदिया शिवाजियन्स, द्वितीय- सुमन एंटरप्रायझेस, तृतीय- बाटा फुटबॉल क्लब आणि चतुर्थ क्रमांकावर गुलमोहर फुटबॉल क्लब राहिले. बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासनाचे पुणे येथील औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाचे उपसंचालक स्वप्नील देशमुख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. देशमुख म्हणाले की, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन मागील ५४ वर्षापासून शहरात फुटबॉल खेळ रुजवून खेळाडू घडवित आहे. या गौरवास्पद कामगिरीने आज फुटबॉलचे उत्कृष्ट खेळाडू घडत आहे. खेळात विजय-पराभव महत्त्वाचा नसून खेळाडूवृत्ती महत्त्वाची असते. खेळातून नागरिकांमध्ये खेळाडूवृत्ती निर्माण होवून चांगले नागरिक घडत असल्याचे त्यांनी सांगितले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी मानद सचिव रोनाप फर्नांडिस, असोसिएशनचे ज्येष्ठ व आधारस्तंभ रिशपालसिंग परमार, संयुक्त सचिव व्हिक्टर जोसेफ, कार्यकारिणी सदस्य राजू पाटोळे, उपाध्यक्ष खालिद सय्यद, संयुक्त सचिव प्रदीप जाधव, खजिनदार तपन परमार आणि जेव्हिअर स्वामी यांचे विशेष योगदान लाभले.

# खरवंडी कासार येथे सराईत गुन्हेगाराचा पोलिसांवर गोळीबार

### सोलापूर गुन्हे शाखा व पाथर्डी पोलिसांच्या संयुक्त कारवाईदरम्यान घटना; आरोपी पसार, पोलीस कर्मचारी थोडक्यात बचावले

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथे सोलापूर जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकासह पाथर्डी पोलिस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांवर एका सराईत गुन्हेगाराने अटक टाळण्यासाठी पिस्तुलातून गोळीबार केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी रात्री घडली. या घटनेत एक पोलीस कर्मचारी थोडक्यात बचावला असून आरोपी साथीदारांसह फरार झाला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील जेऊर येथील सराफ व्यावसायिक अभिनंदन पोद्दार यांना रस्त्यावर लुटणाऱ्या आंतरजिल्हा दरोडेखोर टोळीचा म्होरक्या पावलस ऊर्फ मेहेर कचरू गायकवाड हा खरवंडी कासार येथील भगवानगड रस्त्यावर असल्याची माहिती सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती.







या माहितीच्या आधारे सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पाथर्डीत दाखल झाले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने त्यांनी खरवंडी कासार येथील संशयिताच्या ठिकाणी छापा टाकला. त्या वेळी आरोपी व त्याचे साथीदार तेथे काम करत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्यांना शरण येण्याचे आवाहन केले. मात्र, पोलिसांची ओळख पटताच आरोपी पावलस गायकवाड याने जवळील पिस्तुलातून थेट पोलिसांवर गोळीबार केला.

या गोळीबारात पाथर्डी पोलीस ठाण्याचे कर्मचारी आसाराम बटुळे हे थोडक्यात बचावले. आरोपीने झाडलेली गोळी त्यांच्या कानाजवळून जात केसाला स्पर्श करून गेल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

गोळीबारानंतर निर्माण झालेल्या गोंधळाचा फायदा घेत आरोपी पावलस गायकवाड आणि त्याचे अनोळखी साथीदार पांढऱ्या रंगाच्या एसयूव्ही वाहनातून बीडकडे पसार झाले. घटनेनंतर परिसरात तातडीने नाकाबंदी करण्यात आली.

सदर आरोपीवर अक्कलकोट आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणाचा समांतर तपास सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सुरू होता. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी आपल्या खरवंडी येथील निवासस्थानी लपल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली होती.

त्या आधारे संयुक्त पोलीस पथकाने घरावर छापा टाकला असता आरोपीने थेट पोलिसांवर गोळीबार केला. या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय शिंदे यांच्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फरार आरोपी आणि त्याच्या साथीदारांचा शोध घेण्यासाठी सोलापूर व अहिल्यानगर पोलिसांनी संयुक्त शोधमोहीम हाती घेतली असून तपास सुरू आहे.

## कांद्याला किमान २५ ते ३० रुपये प्रतिकिलो भाव मिळावा : चंद्रकांत लामखडे यांची मागणी

**● निघोज । वीरभूमी –**

कांद्याला किमान २५ ते ३० रुपये प्रतिकिलो भाव मिळावा यासाठी केंद्र व राज्य सरकारने ठोस प्रयत्न करण्याची गरज असल्याची मागणी माजी सरपंच तथा निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत लामखडे यांनी केली आहे. कांद्याच्या दरवाढीमुळे ग्रामीण भागातील बाजारपेठेला चालना मिळेल तसेच कर्जबाजारी शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळेल, असे त्यांनी निवेदनाद्वारे म्हटले आहे.

### कांदा दरवाढीची ग्रामीण भागातून मागणी

■ कांदा हे राज्यातील शेतकऱ्यांचे प्रमुख नगदी पीक असून बागायती पट्ट्यात मोठ्या प्रमाणात कांद्याचे उत्पादन घेतले जाते. ग्रामीण भागातील बाजारपेठ, व्यापार आणि विविध व्यवसायांची उलाढाल मोठ्या प्रमाणात कांदा अर्थकारणावर अवलंबून असते. त्यामुळे कांद्याला चांगला भाव मिळाल्यास शेतकऱ्यांसह व्यापारी, व्यावसायिक आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना मिळते. यामुळे कांद्याच्या भाववाढीसाठी शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी नागरिकांतूनही होत आहे.



यासंदर्भात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन पाठवले आहे.

निवेदनात लामखडे यांनी नमूद केले आहे की, सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी कांदा हे प्रमुख नगदी पीक आहे. मात्र गेल्या दोन ते तीन वर्षांपासून कांद्याला योग्य भाव मिळत नसल्याने अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून कर्जबाजारी झाले आहेत.

कांदा पिकाच्या उत्पादनासाठी प्रति हेक्टर दीड ते दोन लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. अवकाळी पाऊस, खतांच्या वाढलेल्या किंमती, मजुरी खर्च आणि बदलते हवामान यामुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. सध्याच्या बाजारभावानुसार कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर लाखो रुपयांचा तोटा सहन करावा लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

मार्च महिन्यात कांद्याचे उत्पादन बाजारात येते. मात्र योग्य भाव मिळण्याच्या अपेक्षेने शेतकऱ्यांना हा कांदा सहा ते सात महिने साठवून ठेवावा लागतो. या काळात कांद्याचे वजन घटते, तसेच हवामानाच्या परिणामामुळे मोठ्या प्रमाणावर कांदा खराब होतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे दुहेरी नुकसान होत असल्याकडे त्यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे.

नाफेडमार्फत कांदा खरेदी करताना शेतकऱ्यांना किमान २५ रुपये प्रतिकिलो दराने रोखीने पैसे देण्यात यावेत, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

## गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगामातील सिंचनाचे अंतिम आवर्तन सोडा

### आ. आशुतोष काळेंची जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांकडे मागणी

**● कोपरगाव । वीरभूमी –**

गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगामात आतापर्यंत केवळ एकच आवर्तन सोडण्यात आले आहे. चालू वर्षी उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे फळबागा, चारा पिके व ऊस शेतीचे भवितव्य धोक्यात आले आहे त्यामुळे गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगामातील सिंचनाचे अंतिम आवर्तन सोडावे अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



दिलेल्या निवेदनात आमदार आशुतोष काळे यांनी पुढे असे म्हटले आहे की, सन २०२५/२६ मध्ये नाशिक व अहिल्यानगर जिल्हयातं सरासरी १५०% पर्जन्यमानाची नोंद झाली असुन त्यामुळे दारणा गंगापुर धरण समुहातील सर्व प्रमुख धरणे नोव्हेंबर २०२५ पर्यंत पुर्ण क्षमतेने भरलेली होती. गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रातही समाधानकारक पाऊस झाला असला तरी झालेल्या पावसात सातत्य नसल्यामुळे पावसाची आकडेवारी जरी जास्त दाखवत असतील तरी भूगर्भ पातळी मात्र चालू वर्षी मोठ्या प्रमाणात घटली आहे त्याचे प्रमुख कारण उष्णतेचे वाढलेले प्रमाण आहे.त्यामुळे साहजिकच त्याचा फटका उभ्या पिकांना बसत असल्याने गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगामातील सिंचनाचे आवर्तन सोडणे अत्यंत गरजेचे आहे.

गंगापुर धरणातुन गोदावरी कालव्यांना मिळणारे हक्काचे ०१ टीएमसी पाणी यावर्षी सोडण्यात आले नाही. तसेच ०१.८ टीएमसी क्षमता असलेल्या गौतमी-गोदावरी जलाशयातुन व वालदेवी धरणातून देखील गोदावरी कालव्यांसाठी एक थेंबही पाणी सोडण्यात आलेले नाही. उन्हाळी हंगाम ३० जुनपर्यंत सुरु असतांना सद्यस्थितीत शेतकऱ्यांना उभ्या पिकाच्या सिंचनासाठी पाण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

गोदावरी कालव्याच्या लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी आवर्तन देण्यात धरण समुहात आवश्यक पाणी साठा उपलब्ध असल्यामुळे गोदावरी कालव्यांना उन्हाळी आवर्तन देणे शक्य आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणींचा विचार करून गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगामातील सिंचनाचे आवर्तन सोडण्याबाबत जलसंपदा विभागाला सूचना द्याव्यात अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी दिलेल्या निवेदनात जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

# पाथर्डीत अक्षर संस्कार शिबिराचा उत्साहात समारोप

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असे शिबिर गरजेचे : आयएफएस अधिकारी अक्षय पवार

**● पाथर्डी । वीरभूमी–**

आजच्या स्पर्धेच्या युगात सुंदर हस्ताक्षराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वळणदार अक्षरामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्तम संस्कारांची रुजवणूक होते. अशा शिबिरांच्या माध्यमातून बालकांची सर्वांगीण जडणघडण होऊन भविष्यात सुजाण नागरिक आणि बलशाली भारताचे स्वप्न साकार होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन नुकतीच केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (णझडउ) परीक्षेत यश मिळवून इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस (खऋड) मध्ये निवड झालेल्या नवनियुक्त अधिकारी अक्षय पवार यांनी केले.

श्री वसंतराव नाईक वाचन मंदिराच्या वतीने गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या 'अक्षर संस्कार शिबिराचा' समारोप नुकताच उत्साहात संपन्न झाला. या उन्हाळी शिबिरात एकूण ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

अक्षर संस्कारासोबतच विद्यार्थ्यांना निसर्ग संस्कार, नृत्य संस्कार, रंगभरण संस्कार, नैतिक मूल्ये तसेच शिस्तीचे विविध धडे देण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य अजयकुमार भंडारी होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विष्णुपंत पवार, सुधीर सुडके यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य अजयकुमार भंडारी यांनी विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी संस्कारांचे महत्त्व पटवून दिले. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, संस्कारक्षम विचार आणि सकारात्मक जीवनमूल्यांची रुजवणूक होत असल्याचे त्यांनी सांगितले. अशा उपक्रमांचा विस्तार भविष्यात अधिक व्यापक स्वरूपात व्हावा यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. वाचन मंदिराच्या वतीने राबविण्यात येणारा हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद असून विद्यार्थ्यांना नवी दिशा देणारा असल्याचे त्यांनी नमूद केले.



यावेळी शिबिरातील उत्कृष्ट सुलेखनकार तसेच रंगभरण स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक साहित्य देऊन गौरव करण्यात आला. तसेच शिबिरातील सर्व प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमासाठी सुप्रसिद्ध सुलेखनकार गणेश कांबळे आणि दीपक राठोड यांचे मार्गदर्शन लाभले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रा. सविता पवार आणि वैशाली चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन सचिन चव्हाण यांनी केले, तर आभार विलास पवार यांनी मानले.

# नाशिकमध्ये सीजी पॉवरच्या अति-उच्च दाबाच्या स्विचगिअर निर्मिती प्रकल्पास सुरुवात

### उत्पादन क्षमतेत ८० टक्के वाढ । देशांतर्गत व जागतिक बाजारपेठेतील वाढती मागणी पूर्ण करण्यास मदत

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी सीजी पॉवर अँड इंडस्ट्रियल सोल्युशन्स लिमिटेडने महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव गरुडेश्वर येथे अति-उच्च दाब (एक्स्ट्रा हाय-व्होल्टेज - ईएचव्ही) स्विचगिअर निर्मिती प्रकल्पाचे (एस३ युनिट-II) कामकाज सुरू केल्याची घोषणा केली आहे.

नाशिकच्या अंबड येथे कार्यरत असलेल्या 'एस३ युनिट-I' प्रकल्पाच्या विस्ताराच्या स्वरूपात हा नवीन प्रकल्प उभारण्यात आला आहे. विद्यमान युनिटमध्ये ३३ केव्ही ते ८०० केव्ही क्षमतेच्या ईएचव्ही सर्किट ब्रेकर्सचे उत्पादन केले जाते.

नवीन एस३ युनिट-II मध्ये ३३ केव्ही ते २४५ केव्ही श्रेणीतील ईएचव्ही सर्किट ब्रेकर्सची निर्मिती करण्यात येणार असून, त्यामुळे कंपनीच्या एकूण उत्पादन क्षमतेत सुमारे ८० टक्क्यांनी वाढ होणार आहे. या प्रकल्पात ५०० केव्ही आणि ३५० केव्ही क्षमतेच्या उच्च-व्होल्टेज चाचणी प्रयोगशाळांसह अत्याधुनिक उत्पादन आणि चाचणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विश्वसनीय वीज पारेषण उपकरणांची वाढती मागणी लक्षात घेऊन हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या सुविधेमुळे युटिलिटीज, रेल्वे, नवीकरणीय ऊर्जा, तेल व वायू क्षेत्र तसेच वीज पारेषण पायाभूत सुविधा प्रकल्पांना अधिक सक्षमपणे सेवा पुरविणे शक्य होणार आहे. याचबरोबर कंपनीच्या निर्यात व्यवसायालाही या प्रकल्पामुळे चालना मिळणार आहे.

पर्यावरणपूरक आणि जबाबदार उत्पादन प्रक्रियेवर भर देत या प्रकल्पात ऊर्जा-कार्यक्षम प्रणाली, पर्जन्यजल संधारण, जल पुनर्वापर व्यवस्था आणि शून्य द्रव विसर्जन (झिरो लिक्विड डिस्चार्ज) कार्यप्रणालीचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे संसाधनांचा कार्यक्षम वापर होण्यासोबतच ऊर्जा खर्च आणि पर्यावरणीय परिणाम कमी होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

याबाबत बोलताना सीजी पॉवर अँड इंडस्ट्रियल सोल्युशन्स लिमिटेडचे ग्रुप मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आणि व्यवस्थापकीय संचालक अमर कौल म्हणाले, एस३ युनिट-II ची सुरुवात हा आमच्या विकास प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे. वीज ग्रीड विस्तार, अक्षय ऊर्जा क्षेत्रातील वाढ आणि पायाभूत सुविधांच्या विकासातून निर्माण होणाऱ्या संधींबाबतचा आमचा आत्मविश्वास या गुंतवणुकीतून दिसून येतो.

भारतासह जागतिक बाजारपेठेत उच्च-व्होल्टेज ट्रान्समिशन उपकरणांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी ही सुविधा महत्त्वपूर्ण ठरेल. नावीन्य, गुणवत्ता आणि उत्कृष्ट कार्यपद्धतीच्या माध्यमातून ग्राहकांच्या बदलत्या ऊर्जा गरजा पूर्ण करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला ही गुंतवणूक अधिक बळकटी देईल.



# SPOT NEWS

## जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालयात वृक्षारोपणाने जागतिक पर्यावरण दिन साजरा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शहरातील जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालयात भारतीय लहुजी सेनेच्या वतीने वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि हरित भविष्यासाठी समाजात जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम उत्साहात पार पडला. वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय आरोटे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. भारतीय लहुजी सेनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुनील सकट आणि भटक्या विमुक्त समाज संघटनेचे शहराध्यक्ष राजाभाऊ वाडेकर यांच्या पुढाकाराने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्रशांत मस्तूद, सचिन घुमरे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते. वृक्षारोपणानंतर उपस्थितांनी लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्प केला. पर्यावरणाचे वाढते प्रश्न, तापमानवाढ, प्रदूषण आणि जंगलतोड याबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच प्रत्येकाने आपल्या आयुष्यात किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले. सुनील सकट म्हणाले की, पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. दिवसेंदिवस वाढणारे प्रदूषण, जंगलतोड आणि हवामानातील बदल ही चिंतेची बाब आहे. वृक्ष हे केवळ ऑक्सिजनचे स्रोत नसून संपूर्ण सजीव सृष्टीचे जीवनाधार आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारून वृक्षारोपणाबरोबरच त्यांचे संगोपन करणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटकाने पर्यावरण रक्षणाच्या चळवळीत सहभागी होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

## डॉ.अमोल बागुल यांची एआयच्या गाण्यांमधून जनगणनेची जनजागृती

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

प्रधान जनगणना अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे यांच्या निर्देशानुसार जनगणना २०२७ च्या जनजागृती मोहिमेला नवे आणि आधुनिक स्वरूप देत प्रगणक तथा जनगणना ब्रँड अँबेसिडर कवी डॉ. अमोल बागुल यांनी मराठी भाषेत जनगणनेवरील प्रेरणादायी गीतांचे लेखन करत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि चॅट जीपीटीच्या सहाय्याने या गीतांना सुरेल संगीत, आकर्षक ताल, लय आणि आधुनिक ध्वनिमुद्रणाची जोड देऊन गाणी तयार केली आहेत. आले जनगणनेचे पर्व, सज्ज अहिल्यानगर सर्व, स्वगणना करूया चला, पावसातली जनगणना यांसारख्या गीतांसह सुमारे १० गाणी तयार करण्यात आली असून जनगणनेचा संदेश घराघरांत पोहोचविण्यासाठी विशेष रिंगटोन, जिंगल्स आणि ऑडिओ संदेश देखील विकसित केले आहेत,ही गाणी विविध रेडिओ चॅनेल, एफएम केंद्रे तसेच सोशल मीडियावरील विविध प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत असून नागरिकांकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या गीतांच्या किंवा आर कोड विमोचनाप्रसंगी आयुक्त श्री डांगे यांनी नमूद केले की संगीताच्या माध्यमातून जनगणनेचा संदेश प्रभावीपणे पोहोचत असल्याने नागरिकांमध्ये जनगणनेविषयी जागरूकता वाढत आहे.परिणामी, प्रगणकांना अचूक माहिती संकलित करण्यासाठी अधिक सहकार्य मिळत असल्याचे दिसून येत आहे.जनगणना जनजागृतीसाठी तंत्रज्ञान, साहित्य आणि संगीत यांचा संगम घडवून आणणारा हा उपक्रम राज्यात आदर्शवत ठरत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यासाठी डॉ.बागुल यांना नागेंद्र मुतकेकर (अतिरिक्त आयुक्त), मेहेर लहारे (सहाय्यक आयुक्त), शहाजान तडवी-(प्र.उपायुक्त), राकेश कोतकर (जनगणना विभाग प्रमुख) तसेच बाळासाहेब पवार (प्रभाग अधिकारी),रफिक देशमुख,मास्टर ट्रेनर प्रा.संतोष देशमुख,पर्यवेक्षिका अलका दहातोंडे, यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.

## अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण रद्द करण्यासाठी बीड ते मुंबई लॉग मार्च

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अनुसूचित जातीतील अन्यायकारक उपवर्गीकरण रद्द करण्याच्या प्रमुख मागणीसाठी बीड ते मंत्रालय, मुंबई दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या लाँग मार्चच्या यशस्वी नियोजनासाठी रविवार दि. ७ जून २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता तारकपूर बसस्थानक शेजारील हॉटेल व्ही स्टार येथे कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस लाँग मार्चचे प्रमुख संयोजक सिद्धार्थजी शिनगारे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील प्रमुख कार्यकर्ते, विहार समितीचे सदस्य, सामाजिक, धार्मिक व राजकीय संघटनांचे पदाधिकारी तसेच भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणारे सुरेश बनसोडे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील समस्त आंबेडकरी समाजबांधव, कार्यकर्ते व भीमसैनिकांनी या महत्त्वपूर्ण बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहून उपवर्गीकरणाविरोधातील लढ्यास बळ द्यावे, असे आवाहन केले आहे. तसेच आगामी लाँग मार्चच्या नियोजनाबाबत महत्त्वपूर्ण चर्चा होणार असल्याने सर्वांनी वेळेत उपस्थित राहून आपल्या सूचना व मते मांडावीत, असेही त्यांनी नमूद केले. या बैठकीत लाँग मार्चची रूपरेषा, संघटनात्मक तयारी आणि विविध स्तरांवरील जनजागृती अभियानाबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

# धरणांतील पाणीपातळी खालावल्याने कोपरगावच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम; नागरिकांनी पाणी उकळून व गाळून वापरावे

### नगराध्यक्ष पराग संधान यांचे नागरिकांना आवाहन । साठवण तलाव व जलशुद्धीकरण केंद्राची पहाणी



**● कोपरगाव । वीरभूमी –**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांनी तळ गाठल्याने शहरात येणाऱ्या पाण्याच्या गुणवत्तेवर परिणाम झाला आहे. धरणातून येणारे पाणी साठवण तलावात पोहोचतानाच अत्यंत खराब अवस्थेत येत असल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष पराग संधान, नगरसेवक अनिल आव्हाड आणि संदीप देवकर यांनी नगरपरिषदेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांसोबत शहराच्या फिल्टरेशन प्लांट तसेच साठवण तलावाची प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.

पाहणीदरम्यान पाण्याची गुणवत्ता खालावल्याचे स्पष्ट दिसून आले. प्रशासनाकडून पाणी शुद्धीकरणासाठी आवश्यक ती प्रक्रिया केली जात असली तरी मूळ स्रोतामधूनच खराब पाणी येत असल्याने फिल्टरेशननंतरही काही प्रमाणात पाण्याच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

तसेच, पाणी अधिक स्वच्छ करण्यासाठी अतिरिक्त रासायनिक पदार्थांचा वापर केल्यास नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने आवश्यक त्या मर्यादितच प्रक्रिया करण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली. जोपर्यंत नवीन रोटेशन येत नाही तोपर्यंत आहे ते पाणी पुरवठा काही प्रमाणात पाणी खराब येऊ शकते याची नोंद नागरिकांनी घ्यावी कारण फिल्टर केल्यानंतर देखील सदरचे पाणी आपल्याला हवे तेवढे फिल्टर होत नाही ही वस्तुस्थिती धरणातील खराब पाण्यामुळे निर्माण झाली आहे.

नगराध्यक्ष पराग संधान यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, सध्या पाण्याच्या उपलब्धतेसाठी नवीन रोटेशन येई पर्यंत नागरिकांनी काळजी घेणे आवश्यक आहे. घरगुती वापरासाठी पाणी शक्यतो उकळून, गाळून आणि स्वच्छ भांड्यात साठवून वापरावे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींनी पिण्याच्या पाण्याबाबत अधिक दक्षता घ्यावी.

नगरपरिषद नागरिकांच्या आरोग्याची पूर्ण काळजी घेत असून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. पाणीपुरवठा सुरळीत व सुरक्षित राहावा यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## धोत्रे बु. सेवा सहकारी सोसायटीच्या व्हा. चेअरमनपदी रविंद्रकुमार भांड बिनविरोध



**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

पारनेर तालुक्यातील धोत्रे बु. विकास सेवा सहकारी सोसायटीच्या व्हा.चेअरमनपदाची निवड प्रक्रिया विशेष सभेत पार पडली असून रविंद्रकुमार सबाजी भांड यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. ही निवड श्रीमती शुभांगी सराफ (सहकार अधिकारी, श्रेणी २) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या निवड प्रक्रियेसाठी झालेल्या विशेष सभेत व्हा. चेअरमन पदासाठी रविंद्रकुमार सबाजी भांड यांचाच एकमेव अर्ज प्राप्त झाला. त्यांच्या अर्जास सूचक म्हणून रभाजी बबन भांड तर अनुमोदक म्हणून विजय लहानू रोडे यांनी पाठिंबा दिला.

एकमेव अर्ज असल्याने सभेच्या अध्यक्षा श्रीमती शुभांगी सराफ यांनी रविंद्रकुमार सबाजी भांड यांची व्हा.चेअरमनपदी बिनविरोध निवड जाहीर केली.

या विशेष सभेस सोसायटीचे चेअरमन रभाजी भांड, संचालक हारकू भिटे, विजय रोडे, दिपक भागवत, नंदकुमार राहिंज, सखाराम रोडे, भास्कर कुटे आणि सदानंद रोकडे आदी उपस्थित होते. निवड प्रक्रियेस सोसायटीचे सचिव आर. के. भांड यांनी सहकार्य केले. निवडीनंतर नूतन व्हा.चेअरमन रविंद्रकुमार भांड यांचा सर्व संचालक मंडळ तसेच राजू रोडे, राजू भांड, रामदास रोडे, बाळासाहेब नाईकवाडी, संतोष पाचारणे यांच्यासह मित्रपरिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## ज्ञानवर्धिनीच्या शालेय सुविधांसाठी संस्था आर्थिक सहाय्य करणार

### सुमतीलाल कोठारी । डॉ. सी. पी. देशपांडे यांच्या स्मरणार्थ पेवर ब्लॉक व शेडचे लोकार्पण

**● अकोले । वीरभूमी –**

ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा व बालकमंदिर येथे नव्याने बसविण्यात आलेल्या पेवर ब्लॉकच्या कामाचे लोकार्पण उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. दिवंगत डॉ. सी. पी. देशपांडे (बाबा) यांच्या स्मरणार्थ हा उपक्रम राबविण्यात आला असून, सन्माननीय डॉ. सुधाताई देशपांडे यांच्या आर्थिक सहकार्यातून हे महत्त्वपूर्ण काम पूर्ण करण्यात आले.



पेवर ब्लॉक कामाचे लोकार्पण हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी आणि कार्यकारिणी सदस्या प्रा. ज्योतीताई कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. शालेय परिसरातील विद्यार्थी, शिक्षक व पालकांच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या या कामामुळे परिसराचे सौंदर्य वाढण्यासोबतच स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या दृष्टीनेही मोठा लाभ होणार असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

याशिवाय, शाळा भरताना आणि सुटताना पालकांना ऊन-पावसात उभे राहावे लागू नये यासाठी शाळेच्या परिसरात प्रशस्त शेडची उभारणी करण्यात आली आहे.

समारंभात बोलताना प्रा. ज्योतीताई कुलकर्णी म्हणाल्या, सामाजिक भान आणि कर्तव्यभावनेतून दान करण्याची परंपरा कायम राहिली पाहिजे. शिक्षकांनी आपले कार्य मनापासून करावे, हेच त्यांचे खरे पुण्य आहे. शिक्षकाची आदर्श प्रतिमा विद्यार्थ्यांच्या मनात कायम राहते. आधुनिक शिक्षणतत्त्वांची जोड देत आदर्श समाज घडविण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

यावेळी शाळा व्यवस्थापनाच्या वतीने डॉ. सुधाताई देशपांडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

संस्थेचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ज्ञानवर्धिनी शाळेची गुणवत्ता, शैक्षणिक दर्जा आणि पालकांचा विश्वास कायम राखण्यासाठी हिंद सेवा मंडळ नेहमीच खंबीरपणे पाठीशी उभे राहील. शालेय सुविधांच्या उभारणीसाठी आवश्यक ते आर्थिक सहकार्य करण्यात येईल. सर्वसामान्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी संस्था कोणतीही कमतरता भासू देणार नाही.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मॉडर्न हायस्कूलचे चेअरमन मोरेश्वर धर्माधिकारी होते. यावेळी कार्यकारी सदस्य दिलीपभाई शहा, ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन बाळासाहेब वडजे, प्राथमिक विभागाच्या चेअरमन स्मिता मुंदडा, बालकमंदिरचे चेअरमन रामेश्वर रासने, हिंद सेवा मंडळाचे सहाय्यक सचिव योगेश देशमुख, सुरेखा धर्माधिकारी, पुष्पा वाणी, पत्रकार अमोल वैद्य, माजी प्राचार्य संतोष कचरे, पर्यवेक्षक सुधीर जोशी, दैवज्ञ रावसाहेब यांच्यासह शिक्षक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मुख्याध्यापक रावसाहेब नवले यांनी केले. अध्यक्षीय सूचना बाळासाहेब मांडे यांनी मांडल्या, तर अनुमोदन सोनाली मालवणकर यांनी दिले. सूत्रसंचालन दत्ताभाऊ पोपेरे यांनी केले. योगेश नवले यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# करंदीत दशपर्णी अर्क निर्मिती व माती परीक्षण कार्यशाळा उत्साहात

### महिलांना 'लखपती' बनवण्याचा निर्धार; पर्यावरण दिनानिमित्त १०० वृक्षांचे वृक्षारोपण

**● पारनेर । वीरभूमी–**

पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी पारनेर तालुक्यातील आदर्श गाव करंदी येथे पाणी फाउंडेशन व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मळगंगा महिला सेंद्रिय शेती गट आणि करंदी ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने आयोजित या कार्यशाळेत 'दशपर्णी अर्क निर्मिती' आणि 'माती परीक्षण' या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे, उमेदच्या अधिकारी स्वप्नाली तोडमल, पाणी फाउंडेशनचे निवृत्ती विधाते, कृषी विभागाच्या पठारे, करंदीच्या लोकनियुक्त सरपंच नंदा भास्कर गव्हाणे तसेच उपसरपंच अर्जुन ठाणगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विश्व पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सरपंच नंदा गव्हाणे यांच्या हस्ते गावात चिंच व पाम वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, केवळ आजच नव्हे तर भविष्यात गावातील प्रत्येक रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करून करंदी गाव हिरवेगार करण्यासाठी ग्रामपंचायत कटिबद्ध आहे. पर्यावरण दिनानिमित्त गावात १०० वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांनी सेंद्रिय शेती करणाऱ्या महिलांना प्रोत्साहन देत त्यांच्या शेतीविषयक समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तर उमेदच्या अधिकारी स्वप्नाली तोडमल यांनी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर भर देत प्रत्येक महिलेला घरगुती उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक कर्ज उपलब्ध करून दिले जाईल तसेच कौशल्य विकासाच्या माध्यमातून प्रत्येक महिलेला 'लखपती' बनविण्याचा निर्धार व्यक्त केला.



कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मळगंगा सेंद्रिय शेती गटाच्या अध्यक्षा सुवर्णा एकविरे, विमल चौधरी, मनीषा ठाणगे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य पाटीलबा ठाणगे, भाऊसाहेब गांगड, गणेश चौधरी, अलका केदार, सोनाली चौधरी, भूषण थोरात, ललिता पिंपरकर, भास्कर गव्हाणे, लता ठाणगे, सिंधूबाई ठाणगे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना तंटामुक्ती अध्यक्ष राधुजी ठाणगे यांनी केली. सावळेराम ठाणगे, जिजाभाऊ थोरात, लखन ठाणगे आणि संतोष थोरात यांनी कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य केले. शेवटी ग्रामपंचायत अधिकारी ओल्विन शेक्सपियर यांनी उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांचे आभार मानले.

# हंगा तळ्यात केवळ १५ टक्के पाणीसाठा शिल्लक; पारनेरकरांना सतर्कतेचा इशारा

### महिना-दीड महिना पुरेल एवढेच पाणी उपलब्ध । काटकसरीने वापर करण्याचे नगरपंचायतीचे आवाहन

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या हंगा तळ्यातील पाणीसाठा चिंताजनकरीत्या घटला असून सध्या केवळ १५ टक्के पाणी शिल्लक राहिले आहे. उन्हाळ्यातील तीव्र उष्णता आणि वाढत्या बाष्पीभवनामुळे तळ्यातील पाणीपातळी झपाट्याने कमी झाली असून, नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन नगरपंचायत प्रशासनाने केले आहे.


मागील वर्षी पारनेर शहर व परिसरात समाधानकारक पाऊस झाल्यामुळे नद्या, नाले आणि हंगा तळे पूर्ण क्षमतेने भरले होते. त्यामुळे शहराच्या पाणीपुरवठ्याबाबत कोणतीही चिंता नव्हती. मात्र, यंदाच्या उन्हाळ्यातील कडक तापमानामुळे पाणीसाठ्यावर मोठा परिणाम झाला आहे.

या संदर्भात माहिती देताना नगरपंचायतीचे पाणीपुरवठा सभापती योगेश मते यांनी सांगितले की, उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे हंगा तळ्यातील पाणीसाठा झपाट्याने घटला आहे. सध्या उपलब्ध असलेला साठा अंदाजे महिना ते दीड महिना पुरेल इतकाच आहे. येत्या काळात मान्सूनचे आगमन उशिरा झाल्यास शहरावर गंभीर पाणीटंचाईचे संकट निर्माण होऊ शकते.

उपलब्ध पाणीसाठा आगामी काळात पुरवणे हे प्रशासनासमोर मोठे आव्हान असणार असल्याने नगरपंचायतीने पाणीपुरवठ्याचे काटेकोर नियोजन सुरू केले आहे. त्याचबरोबर नागरिकांनीही पाण्याचा जपून वापर करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

योगेश मते यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, गाड्या धुणे, अंगणात पाणी मारणे किंवा इतर अनावश्यक कामांसाठी पाण्याचा वापर टाळावा. उपलब्ध पाण्याचा वापर केवळ पिण्याच्या आणि अत्यावश्यक घरगुती गरजांसाठीच करावा. पाण्याचा अपव्यय टाळल्यास संभाव्य संकटाचा सामना अधिक प्रभावीपणे करता येईल.

जलसंकटाचा सामना करण्यासाठी प्रशासनाचे नियोजन महत्त्वाचे असले तरी त्याला लोकसहभागाची जोड मिळणे तितकेच आवश्यक आहे. भविष्यात पाणीटंचाईची तीव्रता वाढू नये यासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने वागून 'थेंब-थेंब पाणी वाचवा' हा संदेश कृतीत उतरवावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# गुरव पिंपरी येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील मंदिर जीर्णोद्धाराचा शिलालेख आढळला

## नागेश्वर मंदिरातील खांबावरील लेखातून सतराव्या शतकातील स्थापत्य परंपरेचा उलगडा

**● श्रीगोंदा/कर्जत । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील गुरव पिंपरी येथील नागेश्वर महादेव मंदिरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडातील एक महत्त्वपूर्ण शिलालेख आढळून आला असून, या शिलालेखामुळे तत्कालीन सामाजिक, धार्मिक व स्थापत्य परंपरेवर प्रकाश पडला आहे. पुणे येथील प्रसिद्ध शिलालेख अभ्यासक अनिल किसन दुधाणे यांनी या शिलालेखाचे वाचन केले असून संशोधन कार्य राजेश पोपट इंगळे यांनी केले आहे.


गुरव पिंपरी येथील नागेश्वर महादेव मंदिराच्या मुख्य सभामंडपातील प्रवेशद्वारासमोरील आतील खांबावर हा शिलालेख कोरलेला आहे. तीन ओळींचा हा लेख देवनागरी लिपीत मराठी भाषेत कोरलेला असून सततच्या रंगरंगोटीमुळे अक्षरे काहीशी अस्पष्ट झाली असली तरी छाप घेतल्यानंतर मजकूर स्पष्टपणे वाचण्यात यश आले.

लालेखामध्ये पुढील मजकूर आढळतो –

*माणकोजी खाती याने नवा खांब बसविला. शके १५८६ जेष्ठ वद्य प्रतिपदा सोमवार.*

या उल्लेखानुसार शालिवाहन शक १५८६, क्रोधीनाम संवत्सर, ज्येष्ठ वद्य प्रतिपदा म्हणजेच सोमवार, दि. १६ मे १६६४ रोजी माणकोजी खाती यांनी मंदिरातील जीर्ण झालेल्या तुळईस आधार देण्यासाठी नवीन खांब बसविला होता. यावरून छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मंदिरांच्या जीर्णोद्धाराची कामे नियमितपणे केली जात असल्याचे स्पष्ट होते.

या शिलालेखातील खाती या शब्दालाही विशेष ऐतिहासिक महत्त्व आहे. राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र व कर्नाटकातील अनेक शिलालेखांमध्ये खाती ही संज्ञा सुतार किंवा बांधकाम कारागीर यांच्यासाठी वापरली गेल्याचे दिसते. त्यामुळे माणकोजी खाती हे मंदिराच्या जीर्णोद्धाराशी संबंधित प्रमुख कारागीर असावेत, असा निष्कर्ष अभ्यासकांनी व्यक्त केला आहे. या उल्लेखामुळे केवळ दातेच नव्हे तर प्रत्यक्ष काम करणाऱ्या कारागिरांची नावे



नोंदविण्याची परंपराही तत्कालीन समाजात अस्तित्वात असल्याचे अधोरेखित होते.

हा शिलालेख सतराव्या शतकातील स्थापत्य परंपरा, मंदिर संवर्धन आणि ग्रामीण धार्मिक जीवन यांचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन संचालित शिवदुर्ग वारसा संवर्धन समितीने हा ऐतिहासिक वारसा प्रकाशात आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. तसेच बबन वेताळ, दिगंबर भुजबळ, प्रा. कानीफनाथ उगले आणि स्थानिक नागरिकांचेही या शोधकार्याला सहकार्य लाभले.

इतिहास अभ्यासकांच्या मते, अशा शिलालेखांमधून ग्रामीण भागातील सांस्कृतिक आणि स्थापत्य वारशाचे जतन होण्यास मोठी मदत होत असून भविष्यात या परिसरातील आणखी ऐतिहासिक पुरावे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



# अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी न करणाऱ्या ग्रामपंचायतींवर कारवाई करा

## राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समितीचे तहसीलदारांना निवेदन

**● पाथर्डी । वीरभूमी–**

राज्य शासनाचे स्पष्ट आदेश असतानाही काही ग्रामपंचायतींनी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी केली नाही तसेच गावातील कर्तृत्ववान महिलांना दिला जाणारा अहिल्यादेवी होळकर पुरस्कारही प्रदान केला नाही. अशा ग्रामपंचायतींची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष नानासाहेब (नानाभाऊ) पडळकर आणि राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समितीच्या कार्यकर्त्यांनी केली आहे.

यासंदर्भात पाथर्डीचे नायब तहसीलदार किशोर सानप यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष




नानाभाऊ पडळकर, मोहजचे माजी सरपंच गणेश चितळकर, दत्ताभाऊ दातीर, सोपान जाधव, गोविंद लोखंडे आणि अर्जुन लोखंडे उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, पाथर्डी तालुक्यातील काही ग्रामपंचायतींमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आलेली नाही. तसेच शासनाच्या निर्देशानुसार गावातील कर्तृत्ववान महिलांना देण्यात येणारा अहिल्यादेवी होळकर पुरस्कारही वितरित करण्यात आलेला नाही. ही बाब शासनाच्या आदेशांचे उल्लंघन करणारी असल्याचे कार्यकर्त्यांनी निदर्शनास आणून दिले.

तालुक्यातील अशा ग्रामपंचायतींची चौकशी करून संबंधित ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामविकास अधिकारी यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याबाबत नानाभाऊ पडळकर यांनी लेखी निवेदन सादर केले असून, शासनाचा आदेश असतानाही जयंती साजरी न करणे आणि कर्तृत्ववान महिलांना पुरस्कार न देणे हा गंभीर प्रकार असल्याचे नमूद केले आहे. संबंधितांवर तातडीने कारवाई करून शासन आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली.

# नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करणे काळाची गरज : आ. आशुतोष काळे

**● कोपरगाव । वीरभूमी–**

पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. हवामान बदलाचे संकट आणि वाढते तापमान यावर मात करायची असेल तर प्रत्येकाने हरित पर्यावरणासाठी वृक्षारोपण करणे आणि आपल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करण्याचा दृढ संकल्प करणे काळाची गरज असल्याचे मत आमदार आशुतोष काळे यांनी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या वतीने पर्यावरण दिनाचे औचित्य साधत परिसरात वृक्षारोपण करण्यात आले यावेळी व्यक्त केले.




औद्योगिक आणि सामाजिक प्रगती साधत असताना आपण निसर्गाचे देणे लागतो ही भावना विसरून चालणार नाही. कारखान्यासारख्या औद्योगिक परिसरात हरित पट्टा निर्माण केल्याने प्रदूषण नियंत्रणात मोठी मदत होते. केवळ झाडे लावणे पुरेसे नसून त्यांचे संगोपन करून ती जगवणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. यावर्षी शासनाने पर्यावरण दिनानिमित्त पृथ्वी देत असलेल्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करू नका, हवामानासाठी त्वरित कृती करणे गरजेचे असल्याची संकल्पना ठरवली आहे. प्रत्येकाने या संकल्पनेचा गांभीर्याने विचार करून एक नागरिक एक झाड ही संकल्पना प्रत्येकाने आपल्या जीवनात उतरवण्याचे आवाहन यावेळी आ. आशुतोष काळे यांनी उपस्थितांना केले.

# श्रीगोंदा तालुक्याच्या उत्तर भागात जोरदार पाऊस, गारपीट व वादळी वाऱ्याने नुकसान

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

शुक्रवार (दि.५) रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास श्रीगोंदा तालुक्याच्या उत्तर भागात अचानक झालेल्या जोरदार पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे अनेक गावांमध्ये मोठे नुकसान झाले. चवर सांगवी, तरडगव्हाण, थिटे सांगवी, बनपिंपरी परिसरात जोरदार पावसासह गारपीट झाली. तर घोगरगाव, चिखलीसह तालुक्यातील अनेक भागांत वादळी वाऱ्यांनी कहर केला.

वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी विजेचे खांब पडल्याने वीजपुरवठा विस्कळीत झाला. तसेच डाळिंब, पपई व इतर फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अचानक आलेल्या या अवकाळी संकटामुळे शेतकऱ्यांची मोठी



धांदल उडाली. अनेक शेतकऱ्यांच्या गोठ्यावरील पत्रे उडून गेली असून काहींच्या कांदा चाळी तसेच घरांवरील पत्र्यांचेही नुकसान झाले आहे. जवळपास एक तास सुरू असलेल्या पावसादरम्यान गोट्यांच्या आकाराच्या गारा पडल्याने पिकांना मोठा फटका बसला.



दरम्यान, श्रीगोंदा शहरासह अनेक गावांमध्ये जोरदार वादळी वारे वाहिल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करून शासनाने तातडीने मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# पारनेरसह परिसरात पहिल्या पावसाचे दमदार आगमन

## वादळी वाऱ्यासह जोरदार वर्षाव । उकाड्यातून दिलासा, बळीराजा सुखावला

**● पारनेर । वीरभूमी –**

गेल्या अनेक दिवसांपासून असह्य उकाडा आणि कडक उन्हाच्या झळा सहन करणाऱ्या पारनेरकरांना गुरुवारी मोठा दिलासा मिळाला. दुपारनंतर पारनेर शहरासह परिसरात वादळी वाऱ्यासह झालेल्या जोरदार पावसाने मान्सूनपूर्व सरींचे दमदार आगमन झाले. या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून उकाड्याने त्रस्त नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

दुपारनंतर अचानक आकाशात ढगांची दाटी झाली आणि काही वेळातच पावसाने जोर धरला. शहरातील मुख्य बाजारपेठ, बसस्थानक परिसर तसेच विविध भागांत जोरदार पाऊस झाला. बसस्थानक चौक, आनंदनगर



आणि राहुलनगर या सखल भागांत पाणी साचल्याचे चित्र दिसून आले. अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर झालेल्या या पावसामुळे नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद पाहायला मिळाला.

या पावसाचा सर्वाधिक फायदा शेती क्षेत्राला होणार असल्याने शेतकरी वर्गात उत्साहाचे वातावरण आहे. मृग नक्षत्राच्या तोंडावर झालेल्या या पावसामुळे बळीराजा सुखावला असून मान्सूनचे आगमन वेळेत होण्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे खरिपाच्या हंगामासाठी शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व तयारीला वेग दिला आहे.

तालुक्यातील अनेक भागांत शेतजमिनीची मशागत पूर्ण झाली असून शेतकरी खत व बियाण्यांच्या खरेदीसाठी लगबग करताना दिसत आहेत. या पावसामुळे विहिरी आणि बोअरवेलच्या पाणीपातळीतही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, पावसामुळे तापमानात लक्षणीय घट झाली असून वातावरण आल्हाददायक बनले आहे. मात्र, पहिल्या पावसानंतर आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. साथीच्या आजारांचा धोका लक्षात घेऊन नागरिकांनी उकळलेले पाणी पिणे, स्वच्छतेचे नियम पाळणे आणि आरोग्याबाबत सतर्क राहणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे.

एकूणच, पहिल्याच दमदार पावसाने पारनेरकरांच्या मान्सून प्रतीक्षेला पूर्णविराम मिळाला असून संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आता आगामी दिवसांत पावसाचा जोर कायम राहतो का, याकडे शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पारनेर बाजारतळावरील ऐतिहासिक सभामंच दुर्लक्षाचा बळी

## नगरपंचायत प्रशासनाच्या उदासीनतेमुळे दुरवस्था । वारसा जतनासाठी नागरिकांची तातडीच्या दुरुस्तीची मागणी

**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर शहराच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळींचा केंद्रबिंदू असलेल्या बाजारतळावरील ऐतिहासिक सभामंचाची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. अनेक ऐतिहासिक घडामोडी आणि जाहीर सभांचा साक्षीदार असलेला हा मंच नगरपंचायत प्रशासनाच्या उदासीनतेमुळे दुर्लक्षाचा बळी ठरत असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. या ऐतिहासिक वास्तूची झालेली दुर्दशा पाहून सुज्ञ नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त करत तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे.

पारनेरचा बाजारतळ आणि येथील सभामंच हा तालुक्याच्या राजकीय व वैचारिक इतिहासाचा अविभाज्य भाग मानला जातो. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, जनता दल, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भारतीय जनता पक्ष, शेतकरी संघटना, रिपब्लिकन पक्ष तसेच विविध सामाजिक व धार्मिक संघटनांच्या शेकडो सभा या मंचावर पार पडल्या आहेत.

याच मंचावरून ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार, माजी उपमुख्यमंत्री दिवंगत गोपीनाथ मुंडे, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, दिवंगत सहकारमंत्री बाळासाहेब विखे पाटील, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री पंकजा मुंडे, खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांनी जनतेला संबोधित केले आहे.

तसेच खासदार निलेश लंके, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, माजी आमदार विजय औटी, आमदार काशिनाथ दाते, माजी आमदार दिवंगत बाळासाहेब भारदे, माजी आमदार नंदकुमार झावरे, कॉम्रेड दिवंगत बाबासाहेब ठुबे आणि माजी आमदार दिवंगत शिवाजीराव कर्डिले यांच्यासह अनेक नेत्यांच्या जाहीर सभांची साक्ष या मंचाने दिली आहे. या व्यासपीठावरून झालेल्या भाषणांनी अनेकदा तालुका आणि राज्याच्या राजकारणाला नवी दिशा दिली आहे.

मात्र, आज हा ऐतिहासिक सभामंच स्वतःच दुरवस्थेच्या गर्तेत सापडला आहे. मंचावर जाण्यासाठी असलेल्या पायऱ्या तुटलेल्या असून त्यावरून ये-जा करणे धोकादायक बनले आहे. आतील व बाहेरील भिंतींचे प्लास्टर निखळले असून अनेक वर्षांपासून रंगरंगोटी न झाल्याने संपूर्ण वास्तूचे स्वरूप जीर्ण झाले आहे.

याशिवाय, मंचावरील विद्युत तारा तुटून खाली लोंबकळत असल्याने दुर्घटनेचा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः सार्वजनिक कार्यक्रमांच्या वेळी ही परिस्थिती अधिक गंभीर ठरू शकते, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

ज्या मंचाने पारनेरच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, त्या मंचाची अशी अवस्था होणे अत्यंत दुर्दैवी आहे. लोकप्रतिनिधी आणि नगरपंचायत प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे, अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी दिली.

हा सभामंच केवळ एक इमारत नसून पारनेरच्या ऐतिहासिक वारशाचे प्रतीक आहे. त्यामुळे त्याची तातडीने दुरुस्ती करून सुरक्षित व सुशोभित करण्यात यावे, वीज व्यवस्थेची दुरुस्ती करावी आणि या ऐतिहासिक स्थळाचे जतन करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

दरम्यान, प्रशासनाने याबाबत लवकरात लवकर ठोस पावले उचलली नाहीत, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांकडून देण्यात आला आहे.

